


# स्ट्रेट स्टीच

अभिनंदन आणि स्वागत आहे तुमचे ह्या व्हिडीओमध्ये जिथे तुम्ही ते सर्व काही शिकाल जे उषा स्ट्रेट स्टीच शिलाई मशीनबद्दल शिकण्यासारखे आहे.









ही आमच्या श्रेणीतील सर्वात साधी आणि प्राविण्य मिळवण्यासाठी अत्यंत सोपी मशीन आहे.

सुरुवातीला हे थोडे गुंतागुंतीचे वाटेल पण माझ्यावर विश्वास ठेवा लवकरच तुम्ही या सर्वात प्राविण्य मिळवाल. तर आपण सुरु करूया का?


आपण बॉबीन केस पासून सुरुवात करूया. स्लाइड प्लेट उघडा आणि बॉबीन केस काढा. पुढे बॉबीन केसमधून बॉबीन काढा.

रीळमधून धागा काढा आणि त्याला बॉबिन वाईंडर टेंशन ब्रॅकेटमध्ये फिरवा. अशाप्रकारे बॉबिन वाईंडर स्पिंडलमध्ये बॉबीन ठेवा. पुढे, बॉबिन वाईंडर कडी दाबा जेणेकरून ती बॉबिनला धरून ठेवेल.

बॅलंस व्हीलला डाव्या हाताने धरून ठेवताना मी करत असल्याप्रमाणेच स्टॉप मोशनला मोकळे करा. यामुळे मशीन गतीचक्रापासून वेगळी होईल.







आणि मशीन सुरु करा – जेव्हा बॉबिन पूर्णपणे भरल्या जाईल, तेव्हा ती अपोआप थांबेल. धागा कापून टाका . भरलेली बॉबिन काढा आणि स्टॉपमोशन पुन्हा घट्ट करा. आता इथे – बॉबिनला अशाप्रकारे बॉबिन केसमध्ये ठेवा, आता इथे ही खात्री करायची आहे की धागा घड्याळाच्या दिशेने ढकलल्या जाईल. धाग्याला बॉबिन केसच्या फटीत ओढा. सुमारे 10 सेमी (4 इंच) अतिरिक्त सोडून धाग्याला टेंशन स्प्रिंगच्या खालून काढत डिलिव्हरी आयमधून काढा.भरलेल्या बॉबीनसह बॉबीन केस शटलमध्ये कशी ठेवायची हे पुढे पाहूया. बॉबीन केसला सरळ शटल रेसमध्ये ठेवा, बॉबीन केस स्टॉपर खाचेमध्ये व्यवस्थित बसले आहे याची खात्री करा. बॉबीन केस क्लच सोडा, याने बॉबीन केस घट्ट बसते.





आता तुम्ही प्रत्यक्षात शिलाई सुरु करण्यापूर्वी हे शेवटचे पाऊल... मशीनमध्ये धागा घालणे शिकूया. मी तुम्हाला लगेच हे दाखवणार आहे. प्रथम, बॅलेन्स व्हील तुमच्या दिशेने फिरवून थ्रेड टेक-अप तरफेला अशाप्रकारे त्याच्या सर्वोच्च स्तरावर आणा. नंतर प्रेसर फुट वर करा.धाग्याला थ्रेड गाईड मधून फेसप्लेट वर घ्या आणि त्याला धरून ठेवून, अशाप्रकारे खाली थ्रेड टेंशन युनिटमध्ये टाका.







ह्या बिंदूवर धागा चेक स्प्रिंगमध्ये टाका. नंतर जसे तुम्ही मला करताना बघू शकता, धाग्याला थ्रेड टेक अप तरफेमध्ये मागून पुढे टाका. नंतर धाग्याला फेस प्लेट थ्रेड गाईडमध्ये अशाप्रकारे टाका. पुढे धाग्याला खाली ओढा आणि त्याला नीडल बार थ्रेड गाईडमध्ये टाका. आता शेवटच्या टप्प्यासाठी – सुईच्या छिद्रातून धागा डावीकडून उजवीकडे ओवा. धागा तुमच्या हातात धरून सुईला सुईच्या छिद्रामध्ये गतीचक्र फिरवून खाली करा. गतीचक्र तुमच्या दिशेने तोपर्यंत फिरवा जोपर्यंत सुई पुन्हा बाहेर येत नाही. बॉबिनमधील धागा बाहेर काढण्यासाठी तुमच्या हातातील धागा ओढा.



आता वरील धाग्याचे थ्रेड टेंशन कसे ॲडजस्ट करायचे, ते पाहूया. कमी ताण ठेवण्यासाठी थ्रेड टेंशन नॉब अशाप्रकारे फिरवा आणि ताण घट्ट करण्यासाठी ती अशाप्रकारे फिरवा... स्टिचेसचा अंतिम सफाईदारपणा ठरविण्यात हे अतिशय महत्वाची भूमिका बजावते. थ्रेड टेंशन (धाग्यावरील ताण) हा नेहमी अगदी बरोबर असायला पाहिजे... जर तो ढिला असेल, तर तुम्हाला प्रत्येक स्टीचमध्ये अतिरिक्त धागा दिसून येईल हे अतिशय बेढब दिसेल आणि जर तो जास्त घट्ट असेल तर धागा वारंवार तुटत राहील.



स्टीच रेग्युलेटर नॉब तुम्हाला किती लांब किंवा आखूड स्टिचेस पाहिजे हे ठरविण्यास मदत करतो. नॉब पूर्णपणे खालच्या दिशेने ओढल्यास तो तुम्हाला रिव्हर्स स्टिचिंग करण्यासही मदत करतो.



आता सुई कशी बदलावी, हे शिकूया.
सुई बदलण्यासाठी नीडल क्लॅंप स्क्रू ढिला करा आणि सुई खालच्या दिशेने ओढा. घरगुती शिलाई मशीन्समध्ये सुईचे डोके एका बाजूने सपाट असते आणि दुसऱ्या बाजूने गोलाकार असते. सुई मशीनमध्ये लावताना सपाट बाजू नीडल बारच्या दिशेने असल्याची खात्री करा.




पुढे, आम्ही तुम्हाला शटल कसे स्वच्छ करावे, हे शिकवू.
स्लाईड प्लेट उचला आणि शटल रेसमधून बॉबिन केस काढा. शटल रेस क्लॅंप फिरवून शटल बाहेरच्या दिशेने ओढा. शटल रेस नरम कपड्याने स्वच्छ करा आणि शटल पुन्हा लावून द्या. शटल हूक रिंगमध्ये इथे एक खाच असते... शटल रिंग सहजतेने घसरत जावी यासाठी ही खाच आणि शटल रेसमधील खोबणी जुळायला पाहिजे. शटल रेस बंद करण्यासाठी क्लॅंप्स फिरवा. बॉबिन केस पुन्हा लावा आणि स्लाईड प्लेट बंद करा.











शेवटचे पण अतिशय महत्वाचे म्हणजे तुमच्या मशीनने सहजतेने काम करता यावे यासाठी तुम्हाला तिच्यात वेळोवेळी तेल टाकावे लागेल. सहायक पेटीमध्ये एक तेलाची बाटली दिलेली आहे, जी तुमच्या शिलाई मशीनसोबत येते. इथे दाखविल्याप्रमाणे तुम्हाला चिन्हांकित छिद्रांमध्ये तेल टाकावे लागेल. जर तुम्ही तुमची मशीन आठवड्यातून एकदा वापरत असाल, तर तिला महिन्यातून एकदा तेल घाला. जर तुम्ही जर तुम्ही तुमची मशीन महिन्यातून एकदा वापरत असाल, तर तिला तीन महिन्यातून एकदा तेल घाला. ह्या मशीन्स अशा प्रकारातही उपलब्ध आहेत ज्यांचा पाया मजबूत आहे आणि सोबत कव्हर आहे. त्यांचे परिचालन हाताने आणि पायाने होते. ती अशा लोकांसाठी आहे जे उषा उमंग कम्पोझीट शिलाई मशीन हाताने आणि पायाने वापरण्यास प्राधान्य देतात.

ह्या पाठाचा तुम्ही आनंद घेतला असेल, अशी आम्हाला आशा आहे.